# वाङ्मयीन मूल्यमापन

मराठी भाषेचे शिवाजी विष्णूशास्त्री चिपळूणकर येथपासून कुरूंदकर – भास्कर लक्ष्मण भोळे येथपावेतो मराठी निबंधकार गद्यलेखकांनी मराठी भाषा – साहित्य – संस्कृतीचे विचारपूर्वक परिशिलन केले आहे. त्या दृष्टीने विचार करता सभागृहातील व्याख्याने ही ३,५००० वक्त्यांच्या भाषणांमधून उमटून येईल असे मानने चुकीचे ठरेल. तथापि गद्यकारांचा जिव्हाळा हा स्त्री – पुरूष आमदारांच्या भाषणामधून ओत आणि प्रोत नसला तरीही तो आहे, असे निदर्शनास येते. स्त्री – पुरूष आमदार हे विदग्ध गद्यकार नसले तरीही "अंतरीचे द्यावे स्वभावे बाहेरी" या उक्तीनुसार त्यांच्या व्याख्यानातून कुठे कुठे वाङ्मयीन कसोटीवर उतरणारा परिचय घडून आल्याखेरीज राहत नाही. याला स्त्री – आमदारांचे प्रमाण संख्येने कमी असले तरीही आशयानुरूप अधिवक्त्याचे आहे, असे सूचित करता येईल.

स्त्री – आमदारांच्या भाषणातील भाषा- साहित्याचा विचार करता, शब्दक्रम ठरवून नाही, तर शब्दातला अभिनय भरला तरच तो कळतो. साहित्याचा बाजार मांडायचा नाही. आतून आलेल्या उमाळ्यांचे, अंतरंगातील उकल, शब्दांतील मूल्य, शब्दातील अभिनय आणि वक्तृत्व ही महत्त्वाचे.

Reforming art नुसार वाङ्मय मूल्ये सापडणार नाहीत, तरी ती ढळढळीत वास्तवाला धरून आहेत.

वैचारिक मूल्याचे निकष लावताना काहीशी डावी वाटतात, त्या त्या वेळचा प्रश्न, त्या वेळचा उद्वेग, उग्ररूप धारण करू शकतो. शब्दातून वक्तृत्वातील अभिनयता, अन्यायाच्या अत्याचाराच्या वेळची, तिची भाषा धारदार असते. स्त्री – आमदारांच्या भाषणांमध्ये कदाचित वाङ्मयीन मूल्ये सापडणार नाहीत, पण त्या मागची भावना ही सुद्धा लक्षवेधी असते.

वक्तृत्वाचा होणारा परिणाम, नाटकाचा परिणाम हा प्रभावी असतो. ग्रामीण भागातील तसेच विदर्भ, मराठवाडा, घाटावरच्या बोलीचा हेल वेगळा असतो. तो त्या

भागातील स्त्री – आमदारांच्या भाषणांतून आढळतो. मातीतून उगवलेल्या त्या बायका आहेत, मातीच्या संस्कारातून त्याच्या वक्तृत्वात त्या बोलीचा उगम झालेला दिसतो.

स्त्री आमदार पुरूष आमदारांपेक्षा सक्षम आहेत, असे म्हटले तर वावगे वाटणार नाही, स्त्री खरोखरच अष्ठभूजा असते. एकाच वेळी स्वयंपाक करत, नवऱ्याला सूचना देणे, मूलाचा अभ्यास घेणे, घराचा हिशोब मांडणे, दिवसाचे महत्त्व समजून त्याप्रमाणे स्वयंपाकातला बदल करणे. संस्कृती, सणसमारंभ सांभाळणे, या सर्व व्यापातून ती घडत जाते, प्रवाहित होते, परिपक्व होते, अनुभवांची शिदोरी तिला शिक्षित करते. त्याप्रमाणे तिच्या भाषेला रंग, रूप, साज चढत जातो.

स्त्री -रंग या पुस्तकात माधवी कुंटेंनी केलेले वर्णन वास्तव आहे. देहबोली स्त्रीच्या भाषेचं अविभाज्य अंग असतं. स्त्री असल्यामुळे शालीनता, मर्यादा हे परंपरेने घालून दिलेले बंधन असते. म्हणून सगळी व्याकुळता, राग, प्रेम, लोभ, माया, डोक्यात उमटते. त्याला शब्दांची जोड मिळते तेव्हा स्त्रीच्या भावनांचा अविष्कार होऊ शकतो. मुद्दा अर्धवट सोडला जात नाही. संबोधनात ओलावा असतो. थेट संवाद मनापर्यंत पोहोचावा अशी तिची धडपड असते. तिचं जगण हे फक्त बुद्धि आणि तर्क याच्या आधारावर उभं नसतं. खर तर भाषा ही वेळ प्रसंगी स्त्रीच हत्यार होते. त्यांचा संताप, राग, द्वेष भाषेतून प्रकट होतो. म्हणून त्या भाषेला उपहासाची किनार, जोरकसपणा असे अलंकार स्त्रिया हवे तेव्हा चढवीत असतात. त्यातल सौंदर्य, लय, ठसका, अलंकरण अजून आपल्या अनुभूतीशी इमान राखीत सहीसलामत रहिलेले आहेत.